# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/12/2023 (शुक्रवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर फिर्यादीचे टेकाडी येथील राहते घर येथे दिनांक १३/१२/२०२३ चे ०७.०० वा. ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निरज देवनाथ चौहान, वय ३२ वर्ष रा. खोरे ले आऊट टेकाडी ता. पारशिवनी हे काही कारणास्तव बाहेरगावी गेले असता त्याच्या घराची देखरेख त्यांचाच चुलत भाऊ हा रात्री १०. ०० वा. ते ०७.०० वा. दरम्यान करत होता. तो पुन्हा घराची देखरेख करण्यासाठी आला असता त्यानी पाहीले की लॉक आतमधुन बंद आहे व सर्वत्र सामान पसरलेले आहे. फिर्यादीने आतमध्ये जावुन पाहीले असता त्याच्या घरातुन १) जुने सोन्याचे दोन कंगन २० ग्रॅम किंमती ००, २) जुने सोन्याचे झुमके किंमती एक जोड अंदाजे १० ग्रॅम वजन किंमती ०० ३) तीन छोटे कानातील रिंग प्रत्येकी २ ग्रॅम किंमती ६ ग्रॅम वजनाची किंमती ०० ४) एक सोन्याची चैन १० ग्रॅम वजनाची किंमती ०० ५) इतर दागीने एकुण ५ तोळे ८ ग्रॅमचे सोन्याचे दागीने ५.८ ग्रॅम किंमती ४५०००/–रू ६.४ जोड चांदी चीप पायल प्रत्येक १५० ग्रॅम एकुण ६०० ग्रॅम चांदी ६००/– रू प्रति तोळे किंमती ३६०००/–रू असा एकुण २,९७,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. अमित आत्राम, पोलीस स्टेशन कन्हान मो क्रं. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

## . तांब्याची तार चोरी

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील खापरी टोला मुरादपुर येथे दिनांक १४/१२/२०२३ चे ११.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रतिक ज्ञानेश्वर देशमुख, वय २६ वर्ष, रा. मानेवाडा नागपुर हा कान्टसोलर कंपनीमध्ये मागिल ३ वर्षापासुन सुपरवायजरचे काम करतो. सन २०१९ पासुन कान्टसोलर कंपनी विशाखापट्टणमचे काम खापरी टोली मुरादपुर येथे सुरू असुन सदर काम हे MEDA कडुन ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम घेतलेले असुन सदर ठिकाणी ६३० केवीचा ट्रान्सफार्मर लावलेला असुन तो सध्या बंद स्थितीत आहे. फिर्यादीने ट्रान्सफार्मरची पाहणी केली असता ट्रान्सफार्मचे नट बोल्ट खोलुन आतमध्ये तांब्याची तार अंदाजे १८० किलो किंमती ५४०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुनिल आदमने पोस्टे बेला मो. नं. ९८९०२३१९४० हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर